# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.05.2026** **वारः रविवार**

**ठळक बातम्या**

- तरुणांना संधी, रोजगार आणि जागतिक ओळख उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं सरकार विविध देशांबरोबर भागीदारी करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन, देशातल्या 51 हजार युवकांना 19 व्या रोजगार मेळ्यातून सरकारी नियुक्तीपत्रांचं वितरण.
- शिर्डी इथं देशातल्या सर्वात मोठ्या खासगी संरक्षण उत्पादन प्रकल्पाचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते उद्घाटन.
- राज्यातील मानसिक रुग्णालयांचं अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा राज्य शासनाचा प्रस्ताव.
- शेतकऱ्यांना डिझेलचा सुरळीत पुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना निर्देश.
- आणि
- अंमली पदार्थ तस्करीविरोधात केलेल्या कारवाईत 24 नायजेरियन नागरिकांना अटक.

**पंतप्रधान**

भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हायला जग उत्सुक असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. देशानं आपल्या कर्मयोगींवर विश्वास ठेवला असून आता त्यांच्या समर्पण, आचरण आणि दैनंदिन कृतींद्वारे त्या विश्वासाला जागणे आणि तो अधिक दृढ करणे ही त्यांची जबाबदारी आहे, असं पंतप्रधानांनी 19 व्या रोजगार मेळ्याला दूरस्थ पद्धतीने संबोधित करताना सांगितलं. तरुणांना संधी, रोजगार आणि जागतिक ओळख उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सरकार विविध देशांबरोबर भागीदारी करत आहे. शाश्वत ऊर्जा, स्वच्छ ऊर्जा क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण केल्या जात आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली. हा रोजगार मेळा देशभरातल्या 47 ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. देशभरातून निवडलेले 51 हजार नवनियुक्त उमेदवार, रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि उच्च शिक्षण विभाग यांसारख्या विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये रुजू होणार आहेत.

नागपूर इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत काल रोजगार मेळाव्याचं  आयोजन करण्यात आलं तर पुण्यात राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तिपत्रांचं वितरण करण्यात आलं.

**<u>शिर्डी</u>**

संरक्षण साहित्याच्या बाबतीत आत्तापर्यंत आयात करणारा देश म्हणून देशाची ओळख होती, परंतु आगामी काळात भारत हा संरक्षण साहित्याच्या संदर्भात निर्यातक्षम असलेला देश होणार आहे असं प्रतिपादन राजनाथसिंह यांनी केलं. शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते.

नवीन युगाचा हा शंखनाद असून, संरक्षण क्षेत्रातील खाजगी भागीदारी सध्याच्या 30 ते 35 टक्क्यांवरून आगामी काळामध्ये 50 टक्क्यांपर्यंत नेणार असल्याचं राजनाथ सिंह यांनी सांगितलं.
ते म्हणाले..

यहा से निकला सुर्यास्त दुश्मनों के मनसुबों का सूर्यास्त करने के लिए पर्याप्त होगा ऐसा भी मेरा विश्वास है। साथियो ऍमिनेशन, मिसाईल, रॉकेट सिस्टम और सॅटेलाईट भारत के प्रोडक्शन से एन्शियरी युनिट्स सप्लायर्स और वेंडर्स जुडेंगे रोजगार बढेगा और शिर्डी सहित आसपास के नौजवानों को कटिंग एज टेक्नोलॉजी का स्किल सेट प्राप्त होगा जो हमें और अधिक सामर्थ्य के साथ इस राष्ट्र के निर्माण में अपना कॉन्ट्रीब्युशन दे पाएंगे।

यावेळी  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, निबे ग्रुपचे गणेश निबे, संरक्षण दलाचे जनरल अनिल चौहान, डीआरडीओचे अध्यक्ष डॉक्टर समीर कामत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आदि मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले...

माननीय राजनाथ सिंहजींना आम्ही विनंती केली होती, आम्हाला चार डिफेन्स कॉरिडॉर तयार करायचे आहेत. नाशिक, पुणे, नागपूर आणि अहिल्यानगर.. राजनाथजींनी तात्काळ त्यासंदर्भात आम्हाला होकार दिला आणि त्याची प्रोसेस त्यांनी अंतिम टप्प्यामध्ये दिलेली आहे. आजही देशाच्या डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग मध्ये महाराष्ट्र नंबर वन आहे आणि आता तो इतका पुढे जाणार आहे की महाराष्ट्राला कोणी थांबवू शकणार नाही हा मला विश्वास आहे.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत असून यामध्ये रॉकेट लॉंचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग,स्वयंचलित ड्रोन आणि विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. निबे ग्रुपनं या प्रकल्पाची उभारणी केली आहे. या प्रकल्पामध्ये 155 मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार

असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची या कारखान्याची क्षमता आहे. भविष्यात भारतातील विविध जलाशयांवर उडणारे विमानही इथे तयार करण्यात येणार आहे.

**<u>मानसिकआरुग्णालय</u>**

महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर इथल्या प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेलं दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. राज्य शासनानं या रुग्णालयांचं अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत असून राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत 12 व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेनं विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

**<u>मुख्यमंत्रीइंधन</u>**

शेतकऱ्यांना आवश्यक तितका डिझेलचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना निर्देश दिले असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल शिर्डी इथं सांगितलं. संरक्षण आणि क्षेपणास्त्र संकुलाच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री शिर्डी इथं गेले असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ग्रामीण भागात इंधन सहज उपलब्ध होत नसल्यानं या सूचना केल्याचं त्यानी सांगितलं. पेट्रोलियम पदार्थांच्या दरवाढीवरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर समाजमाध्यमावरून टीका केली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती कमी असूनही सरकार जनतेवर वाढीव बोजा लादत असल्याचं ते त्यांनी म्हटलं आहे.

**<u>एकलधोरण</u>**

राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसंच आरोग्य आणि कायदेविषयक प्रश्नांचा सर्वंकष विचार करून त्यांना विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ देण्यासाठी ‘एकल महिला धोरण’ तयार करण्यात येणार असल्याची माहिती महिला आणि बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. अशा महिलांच्या समस्या शासनस्तरावर प्रभावीपणे मांडून त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. महिला आणि बाल विकास विभागानं यासंदर्भात शासन निर्णय जारी करून मसुदा समिती गठीत केल्याची माहिती बोर्डीकर यांनी दिली.

**अंमलीपतस्कर-अटक**

ठाणे आणि नवी मुंबई पोलिसांनी संयुक्त मोहिम राबवत आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत 24 नायजेरियन अमली पदार्थ तस्करांना अटक करण्यात आली असून या आरोपींवर कोट्यवधी रुपयांच्या अंमली पदार्थ तस्करीचे गंभीर आरोप आहेत. दरम्यान, कल्याण अंमली पदार्थ विरोधी पथकानं 34 कोटी रुपये किमतीचं सुमारे 10 किलो हेरॉईन जप्त केलं आहे. या प्रकरणी मुख्य पुरवठादार युसूफ पठाणसह पाच जणांना अटक करण्यात आली आहे अशी माहिती पोलीस उपआयुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

**शस्त्रनिर्मितीकारखाना**

गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त झाल्याच्या घोषणेपूर्वी नक्षल्यांनी जंगलात सुरु केलेला शस्त्र निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना यश आलं आहे. 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत,आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांनी दिलेल्या माहितीवरुन, पोलिसांनी ही शस्त्रास्त्रे शोधून काढून नष्ट केली.

**पुन्हावाघ**

भंडाऱ्यातील पवनी तालुक्यातील कोदूर्ली येथील जंगलात लाकूड कापण्यासाठी गेलेल्या 55 वर्षीय इसमावर वाघाने हल्ला करून जागीच ठार केले. हा संपूर्ण थरार मृत व्यक्तीच्या पत्नीच्या डोळयादेखत घडला असून परिसरात भीतीचे वातावरण पसरलं आहे. या घटनेमुळे वनविभागाच्या कार्यक्षमतेवर गावाकऱ्यांनी संताप व्यक्त करीत मृतकाच्या कुटुंबाला आर्थिक मदत जाहीर करावी आणि वाघाला लवकरात लवकर जेरबंद करण्याची मागणी केली आहे.

**पाऊस**

राज्यात काल काही ठिकाणी पावसानं जोरदार हजेरी लावली. सांगली जिल्ह्यात तासगाव, कवठेमहांकाळ, आटपाडी आणि खानापूर या तालुक्यात काल दुपारी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. सातारा जिल्ह्यात वीज पडल्यानं माण तालुक्यातील गोंदवले आणि कोरेगाव तालुक्यातील रामोशीवाडी इथं दोन जणांचा मृत्यू झाला. गेल्या काही दिवसांपासून तीव्र उन्हाचा सामना करत असलेल्या सोलापूरला काल पावसाने झोडपून काढले. या पावसामुळे शहर तसंच जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले असले तरी उकाड्यापासून मात्र काही अंशी दिलासा मिळाला आहे. तर जोरदार वाऱ्यामुळे अनेक भागांतील वीज पुरवठा खंडित झाला होता.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात आज तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस तर मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.